प्रति 'A' प्रमाणे कार्यवाही स्तव 26/6/24

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक, नगर रचना
1091 26.06.24
अधि./कर्म.

62

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
मु.का., पुणे-१. आवक क्र. ................
टिपीव्ही -१/२/३/४/५/६/७ ६२९
25 JUN 2024
-१/१३/२/लेखा/अर्थसंकल्प
कार्यासन मु प्र.अ./उ सं न र./सं न.र.

**प्रादेशिक योजना, पुणे.**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २०(३) अन्वये फेरबदल प्रसिध्द करणेबाबत..

मौ. कुसगाव बु. ता. मावळ येथील गट नं.३१६, ३१७ पै., ३३५ पै., ३६६ पै., ३३९ पै., ३४० पै., ३४२ पै., ३४५ पै., ३८० ते मौ. गेव्हंडे, ता. मावळ येथील गट नं. २६, ८८, ८९, ९०, ९१, ९५, ९६, ९७, १०३, ११७, ११८, १२०, १२३, १२४, १२५,१२६, १२७, १२८ व मौ. आतावन, ता. मावळ येथील गट नं. ३७,३८, ३९, ४०, ४२, ४३, ४६ या मिळकतीमध्ये १५ मी. प्रस्तावित विकास योजना रस्त्या एवजी २४ मी रुंद प्रादेशिक योजना रस्ता प्रस्तावित करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय.

२१२, दुसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत, विधान भवनासमोर, पुणे - ४११००१

निर्णय क्र.प्रा.यो.पुणे/मौ. कुसगाव बु./ता. मावळ/ग.नं. ३१६ व इतर/कलम २०(३)/ सहसंपुवि/ ६२९

दि.२१.०६.२०२४

JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING, TOWN PLANNING AND VALUATION DEPT, PUNE DIVISION

( रा. म. पवार )
सहसंचालक, नगर रचना,
पुणे विभाग, पुणे.

प्रति-

१) मा. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.

२) मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

'A' ३) उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे आदेश नगररचना, संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

४) जिल्हाधिकारी, पुणे.

५) अवर सचिव, नगर विकास विभाग, नवि (१३) मंत्रालय, मुंबई.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदर सूचना शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

६) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.

७) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारगृह, पुणे ४११ ००६.

/- त्यांना विनंती करण्यात येते कि, सोबतची शासकीय सूचना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या भाग-१, पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावी व त्याची प्रत या कार्यालयास पुरविण्यात यावी.

D:\GDK\Section_20(3)\Kusgaon\20__3____Notice (8).doc

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**

सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
२१२, दुसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत, विधान भवनासमोर, पुणे – ४११ ००१.

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

सूचना क्र.प्रा.यो.पुणे/ मौ. कुसगाव बु./ता. मावळ/ग.नं. ३१६ व इतर/कलम २०(३)/सहसंपुवि/९९१
दि. २१ .०६.२०२४

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे), मधील तरतूदीनुसार पुणे जिल्हयाची प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे) शासनाने दि. २५.११.१९९७ रोजी मंजूर केली असून, ती दि.१०.०२.१९९८ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौ. कुसगाव बु. ता. मावळ येथील गट नं.३१६, ३१७ पै., ३३५ पै., ३६६ पै., ३३९ पै., ३४० पै., ३४२ पै., ३४५ पै., ३८० ते मौ. गेव्हंडे, ता. मावळ येथील गट नं. २६, ८८, ८९, ९०, ९१, ९५, ९६, ९७, १०३, ११७, ११८, १२०, १२३, १२४, १२५, १२६, १२७, १२८ व मौ. आतावन, ता. मावळ येथील गट नं. ३७, ३८, ३९, ४०, ४२, ४३, ४६ येथील जमीनी (यापुढे ज्यास "उक्त जमिनी " असे संबोधले आहे), भागशः रहिवास, भागशः शेती तथा नाविकास, भागशः वनिकरण व जलाशय (यापुढे ज्यास "उक्त विभाग" असे संबोधले आहे), दर्शविले असुन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेत, उक्त जमिनीमध्ये १५ मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे;

आणि ज्याअर्थी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेमध्ये, उक्त जमिनीवरील १५ मी रुंद विकास योजना रस्त्याची आखणी एवजी नकाशात दर्शविल्याप्रमाणे नवीन २४ मी. रुंद प्रादेशिक योजना रस्त्याची आखणी प्रस्तावित करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी दि.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**

सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
२१२, दुसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत, विधान भवनासमोर, पुणे – ४११ ००१.

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

सूचना क्र.प्रा.यो.पुणे/ मौ. कुसगाव बु./ता. मावळ/ग.नं. ३१६ व इतर/कलम २०(३)/सहसंपुवि/९९१
दि. २१ .०६.२०२४

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे), मधील तरतूदीनुसार पुणे जिल्हयाची प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे) शासनाने दि. २५.११.१९९७ रोजी मंजूर केली असून, ती दि.१०.०२.१९९८ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौ. कुसगाव बु. ता. मावळ येथील गट नं.३१६, ३१७ पै., ३३५ पै., ३६६ पै., ३३९ पै., ३४० पै., ३४२ पै., ३४५ पै., ३८० ते मौ. गेव्हंडे, ता. मावळ येथील गट नं. २६, ८८, ८९, ९०, ९१, ९५, ९६, ९७, १०३, ११७, ११८, १२०, १२३, १२४, १२५, १२६, १२७, १२८ व मौ. आतावन, ता. मावळ येथील गट नं. ३७, ३८, ३९, ४०, ४२, ४३, ४६ येथील जमीनी (यापुढे ज्यास "उक्त जमिनी " असे संबोधले आहे), भागशः रहिवास, भागशः शेती तथा नाविकास, भागशः वनिकरण व जलाशय (यापुढे ज्यास "उक्त विभाग" असे संबोधले आहे), दर्शविले असुन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेत, उक्त जमिनीमध्ये १५ मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे;

आणि ज्याअर्थी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेमध्ये, उक्त जमिनीवरील १५ मी रुंद विकास योजना रस्त्याची आखणी एवजी नकाशात दर्शविल्याप्रमाणे नवीन २४ मी. रुंद प्रादेशिक योजना रस्त्याची आखणी प्रस्तावित करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी दि.

२५.०८.२०२३ रोजीचे पत्रान्वये शासनास विनंती केली असुन शासनाने दि. २९.११.२०२३ रोजीचे पत्रान्वये या कार्यालयास प्रस्तुत प्रकरणी उचित कार्यवाही करणेबाबत कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदला संदर्भाने करावयाच्या कार्यपध्दतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१५/ प्र.क्र. ४९/ १५/ नवि-१३, दि.०६.०५.२०१५ व दि.०४.०१.२०१६ अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत, (यापुढे ज्यास "उक्त शासन निर्णय" असे संबोधले आहे), व त्याअनुषंगाने शासनाने "प्रस्ताव छाननी समिती" गठीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० पोट कलम (२) मधील तरतूदीनुसार, उक्त जमीनी, 'भागशः रहिवास, भागशः शेती तथा नाविकास, भागशः जलाशय क्षेत्र व भागशः वनिकरण विभागातुन वगळून नकाशात दर्शविल्याप्रमाणे नवीन २४ मी रुंद प्रादेशिक योजना रस्त्याची आखणी प्रस्तावित करणेस खालील अटीस अधीन राहून, उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक आहे. (यापुढे ज्यास "उक्त फेरबदल" असे संबोधले आहे), असे उक्त शासन निर्णयान्वये गठीत "प्रस्ताव छाननी समिती" चे मत झाले आहे;

**अट** -

वन विभागातील रस्त्याचा विकास करणेपूर्वी त्यास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव सादर करून त्यास केंद्र शासनाची / महाराष्ट्र शासनाच्या संबंधीत विभागाची विधिवत मान्यता प्राप्त करून घेणे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेवर बंधनकारक राहील.

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१ पोटकलम (१) अन्वये निर्णय क्र.टिपीएस-१८१५/ प्र.क्र. ४९/ १५/ नवि-१३, दि. ११.६.२०१५ नुसार उक्त अधिनियमाचे कलम २०(२), २०(३) व २०(४) खालील अधिकार विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्रदान केलेले आहेत;

आणि त्याअर्थी, याबाबतीत शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोटकलम (३) अन्वये, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे उक्त प्रादेशिक योजनेत उक्त फेरबदल करण्याचा हेतू या सूचनेव्दारे घोषीत करीत असून उक्त प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने नागरिकांकडून सूचना/ हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या मुदतीत लेखी स्वरुपात मागविण्यात येत आहेत ;

हरकती / सूचना **सहायक संचालक, पुणे शाखा, पुणे, नविन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, बी विंग, पूर्व बाजु, पुणे– ४११ ००१** यांच्या कार्यालयाकडे पाठवाव्यात. उक्त प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ त्यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. प्रस्तुत फेरबदलाबाबत विहीत मुदतीत प्राप्त होणाऱ्या सूचना/ हरकतींवर सुनावणी देण्यासाठी व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन त्यांचा अहवाल सदस्य सचिव यांचेकडे सादर करण्यासाठी सहायक संचालक, पुणे शाखा, पुणे यांना "अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

प्रस्तुतसूचना www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(रा.म. पवार)
सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती
तथा
सहसंचालक, नगर रचना,
पुणे विभाग, पुणे